# चित्पावन मोडक कुल-संमेलन (डोंबिवली २०१३) वृतान्त

चित्पावन मोडक कुल-संमेलन रविवार दि.१४ एप्रिल २०१३ रोजी आदित्य मंगल कार्यालय डोंबिवली येथे डोंबिवलीच्याच सर्वश्री सुहास यशवंत,सचिन शरद व राजीव विश्वनाथ यांच्या पुढाकाराने आणि परिश्रमाने आयोजित केले होते.त्यास २५० पेक्षा जास्त कुलबंधू भगिनींची उपस्थिती होती.

श्री उदयचंद्र विश्वनाथ यांची अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली.त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व ईश पूजन झाल्यानंतर कार्यक्रमास सुरवात झाली. श्री श्रीधर वामन यांच्या प्रस्तावनेनंतर श्री अरविंद वामन यांनी कुल न्यासाबाबत माहिती सांगितली.त्यानंतर श्री रामचंद्र नारायण व त्यांचे सहकारी यांनी सुगम संगीताचा कार्यक्रम सदर केला.श्री प्रमोद लेले प्रेसिडेंट चित्पावन फौंडेशन यांनी युवकांना व्यवसायात पदार्पण व स्पर्धात्मक परीक्षांबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर मोडक कुलातील १) श्री उदयचंद्र विश्वनाथ, कायदेपंडित २) श्री श्रीराम मधुसूदन, सत्र न्यायाधीश ३) श्री विभास गोपाळ, अस्थीशल्यविशारद,४) सौ. सविता रमेश,आदर्श शिक्षिका यांचे सत्कार करण्यात आले.तसेच सन २०१२ मधील १०वी व १२ वी च्या परीक्षेत कुलातील सर्वोत्तम गुण प्राप्त केलेल्या अनुक्रमे चि.निरंजन पराग, पुणे व चि.आदित्य प्रसाद, दापोली यांचे रोख पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. श्री हेमंत अरुण यांनी प्रस्तावित कुलवृतांत संगणक प्रणालीचे प्रात्यक्षिक दाखविले.भोजनोत्तर घराणेनिहाय फोटो काढण्यात आले.परस्पर परिचय व पसायदानानंतर कार्यक्रम समाप्त झाला.